ISSN 2278-0319

Research Journal for Resurrection in Intellectual Disciplines

International Registered and Recognized
Research Journal in Higher Education for all Subjects

Chief Editor
Dr. Khanderavaji S. Kale



RESURRECTION

ISSN – 2278-0319

International Registered & Recognized
Research Journal in Higher Education For all Subjects.

RESURRECTION

Research Journal For Resurrection in Intellectual Disciplines

Vol – 13, Issue- I,
Year –4 (Quarterly)
(May., 2015 to July.,2015)
Est. On - May 2012

Editorial Office

'Hira'
1320, Laxmi Nagar.
Ganeshpur, Behind Sound Cast Factory, Hindalga, Belgaum. Dist- Belgaum-591108. Karnataka (India)

Contact :

09481402640
09420131186

Email-
khanderavaji@rediffmail.com
shakyadeeta26@gmail.com
rrr.journal@gmail.com

WEBSITE:
www.rrrjournals.com

Price Rs. 300/-

CHIEF EDITOR

Dr. Khanderavaji S. Kale
'HIRA' 1320,Laxmi Nagar Ganeshpur.
Hindalga,Belgaum.(KARNATAKA)

EDITOR

Dr. Baumaun Prceda
Prof. of Education,
Board of Education,Bangkok.Thailand.

Dr. Rupesh Devan
Prof. of Physics,
National Dong Hwa Uni.,Taiwan.

Dr. Dattatray More
Principal
Shri. Shahaji Chh. College,Kolhpur.

Dr. R. N. Salve
Prof. of Sociology,
Shivaji University, Kolhapur,(M.S.)

Dr. H. M. Shailaja
Prof. of School Education,
Rani Chennamma University, Belgaum.

Dr. Vilas Kharat
Prof. of Mathematics,
Pune University, Pune.(M.S.)

CO - EDITOR

Dr. M. D. Pujari
Head, Dept. of Accountancy,
Dr. Ghali College, Gadhinglaj

Dr. A. R. Kamble
Head, Dept. of Sociology,
New College, Kolhapur

Bhadvankar P. L.
Head, Dept. of Psycology,
R. B. Madkholkar College,Chandgad

Dr. P. B. Kamble
Dept. of English,
Rajshri Shahu College, Rukhadi

R. D. Kamble
Dept. of Marathi,
College of Arts,Kowad.

V. M. Kadam
Head,Dept. of Sociology,
Vivekanand College, Kolhapur

A. A. Mane
Head, Dept. of Botany
R. B. Madkholkar College,Chandgad

V. K. Dalvi
Head, Dept. of Sociology,
College of Arts,Kowad,

V. V. Kshirsagar
Dept. of Economics,
Arts & Commerce College, Nesari

S. N. Patil
Head, Dept. of Hindi,
R. B. Madkholkar College,Chandgad

Page No-67 to 70
Research Paper-***Sociology***
Research Journal for
Resurrection in intellectual Discipline
ISSN 2278-0319,Vol-13, Issue-1, May., to July.,-2015 (Quarterly)

महिला सबलीकरण : एक संकल्पना

डॉ एस.एम. गावडे
चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

प्रस्तावना :-

भारताला स्वातंत्र्य मिळून पासष्ट वर्षे होऊन गेली. पण तरीही भारतीय समाजातील एक मोठा घटक असलेल्या महिलांना स्वातंत्र्याचा पूर्णपणे लाभ मिळत नाही. या महिलांच्या संरक्षणासाठी व सबलीकरणसाठी आतापर्यंत अनेक कायदे करण्यात आले. पण तरीही महिलांच्यावर विविध प्रकारे अन्याय हा होतच असल्याचे दिसून येते. त्यामुळेच महिलांच्या या प्रश्नांकडे अधिक गांभिर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. महिलांचे प्रश्न कोणते आहेत, ते सोडविण्यासाठी आतापर्यंत कोणी व कशाप्रकारचे प्रयत्न केले आहेत, त्याला कितपत यश आले या सर्वांचा या शोधनिप्रंधाच्या माध्यमातून येथे अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टे :-

महिला सबलीकरण : एक संकल्पना या विषयावर शोध निबंध सादर करत असताना खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. महिला सबलीकरणाचा अर्थ समाजातून घेणे.
२. महिला सबलीकरणाची उद्दिष्टे अभ्यासणे.
३. महिला सबलीकरणासाठी विविध कालखंडात झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
४ महिला सबलीकरणामधील अडथळयांचा अभ्यास करणे.
५. महिला सबलीकरणावर उपाययोजना सूचविणे.

संशोधनपध्दती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. तसेच शोध निबंधाच्या संदर्भात तथ्य संकलनासाठी मासिके, विविध संशोधनपर लेख, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे यासारख्या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

अभ्युपगम :-

१. कालानुरुप महिलांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत आहे.
२. महिलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे.
३. विविध क्षेत्रातील विविध पदावर महिला नोकरी करीत असल्याचे दिसून येते.

४. राजकारणातही दिवसें दिवस महिलांचा सहभाग वाढत आहे.

महिला सबलीकरण : अर्थ

महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलबध करून देणारी ही प्रक्रिया आहे. समाजातील शतकानुशतके अबला
समजल्या जाणा-या महिलांना सबल करुन त्यांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देणे हे महिला सबलीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सर्वच समाजात व सर्वच काळात कमीजास्त प्रमाणात लिंगभेदावर आधारित विषमतेमधून स्त्रियांचे मोठया प्रमाणावर शोषण झाले. त्यामुळेच ही लिंगभेद आणि शोषणावर आधारित सामाजिक,राजकीय आणि अर्थिक व्यवस्था बदलून स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निमार्ण करण्याचा प्रयत्न महिला सबलीकरणाच्या माध्यामातून केला जातो.

महिला सबलीकरणाची उद्दिष्टे :- महिला सबलीकरण प्रक्रियेची खालील उद्दिष्टे असल्याचे दिसून येते.

१. स्त्री-पुरूष समानता -

भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात शतकानुशतके स्त्रियांना पुरषांपेक्षा कनिष्ठ दर्जा दिलेला आहे. सामाजिक धार्मिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व आढळून येते. त्यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीतील लिंगभेदावर आधारित महिलांच्या शोषणाची ही प्रक्रिया नष्ट करून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी संघटना कार्यशील बनलेल्या आहेत.

२. स्त्रियांना न्याय मिळवून देणे :-

भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे ऐतिहासिक काळापासून स्त्रियांवर अन्याय केला जात आहे. त्यांना अनेक गोष्टीपासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या बुध्दिमतेचा व कार्यक्षमतेचा फारसा विकास झाला नाही. त्यांच्यामध्ये न्युनगंडाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक अधिकार मिळवून देऊन त्यांचा विकास साधणे हे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

३. स्त्रियांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी प्रनविणे : -

अनेक वर्षापासून स्त्रियांचे चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र समजले जात होते. त्यामुळे रांधा,वाढा आणि उष्टी काढा हेच काम स्त्रिया करीत होत्या. पुरुषांनी अर्थार्जन करायचे व स्त्रियांनी स्वयपाक करणे, वाढणे व मुलांना सांभाळणे अशीच एक प्रकारे कामाची विभागणी झाली होती. स्त्रियांना पैसा मिळविण्याची क्षमता नाही अशीच पुरुषी समाजाची मानसिकता बनली होती. पण स्त्री ही अर्थव्यवस्थेचा एक महत्वांचा घटक आहे. स्त्री आर्थिकदृष्टया स्वावलंप्री बनल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल या उद्देशाने महिला सबलीकरण महत्वाचे आहे.

४. राजकीय सहभाग वाढविणे : -

पूर्वीपासून राजकीय क्षेत्रातील महत्वाच्या पदावर पुरुषांचीच मक्तेदारी होती. भारतात राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग अगदी नगण्य होता. त्यामुळे राजकरणातील पुरुषवर्गाकडून महिलाच्या विविध प्रश्नाकडे जेवढया गांभीर्याने पहायला पाहिजे होते त्याप्रमाणात पाहिले गेले नसल्यामुळे महिलांचा अपेक्षित विकास झाला नाही. त्यासाठी महिलांचा राजकीय क्षेत्रात व निर्णयाप्रक्रियेत सहभाग वाढविणे हे एक महिला सबलीकरणाचे उद्दिष्टे मानले जाते.

५. शैक्षणिक विकास करणे :-

पूर्वीपासून पुरुषांच्या तुलनेत महिला साक्षरता प्रमाण खुपच कमी आहे. त्यामुळे महिला सबलीकरणाच्या माध्यमातून महिलांच्या मधील साक्षरतेचे प्रमाण वाढवून त्यांचा मानसिक आणि बौध्दिक विकास घडवून आणणे हे उद्दिष्टे ठेवण्यात आले.

महिला सप्रलीकरणासाठीचे प्रयत्न :-

१. ब्रिटिश राजवटीत :-

ब्रिटिशपूर्वकाळात स्त्रियांची स्थिती अत्यंत दैनीय होतीच पण ब्रिटिश काळातील सुरवातीच्या टप्प्यातही तीच स्थिती होती पण नंतर या काळातच स्त्री सुधारणा अथवा स्त्री दर्जा परिवर्तनाचे वारे सुरु झाले. या काळात इश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद, राजा राममोहन रॉय, श्रीमती ॲनी बझंट, गोपाल कृष्ण गोखले इत्यादी समाजासुधारकांनी विशेषकरुन स्त्रियांच्या दर्जात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनीही स्त्रीशिक्षणाला सुरुवात केली परिणामी स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले. सुशिक्षीत स्त्रिया घराबाहेर पडून नोकरी धंदा करु लागल्या. हळूहळू का होईना समाजकारणात व राजकारणात स्त्रिया सहभागी होऊ लागल्या. स्त्रियांच्या सुधारणेसाठी व प्रगतीसाठी ब्रिटीश शासनाने काही कायदे केले. उदा. १८५६ च्या कायदयानुसार स्त्रियांना आपल्या मृत पतीच्या संपतीवर अधिकार वैगेरे.

२. स्वातंत्र्यानंतरचा काळ :-

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने स्त्री-पुरुष समानतेचे तत्व मान्य करून जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करण्याचे स्त्रीला स्वातंत्र्य दिले. परिणामी स्त्रियांच्या स्थितीत जलद गतीने परिवर्तन होण्यास मदत झाली.

भारतीय राज्यघटनेतील तत्वानुसार स्त्री-पुरुष भेदभाव न मानता स्त्रीयांना समानतेचा अधिकार, मालमतेचा अधिकार, स्थानिक स्वराज्य संस्थेत-सहभागी होण्याचा अधिकार दिला. रोजगाराचा, मोफत व सक्तीचे शिक्षण, आरोग्य संवर्धन इ.चे अधिकार प्राप्त झाले. तसेच १९९२ मधील ७३ व्या घटनादुरुस्तीने तर राजकारणात स्त्रीयांना आरक्षणही देण्यात आले. त्यामुळे साहजिकच भारतीय स्त्रीयांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडून आले.

महिला सबलीकरणातील अडथळे :-

१. जाणीव जागृतीचा अभाव :-

घटनेने दिलेले अधिकार, शिक्षणाचे सार्वत्रिकरण व आरक्षण वैगेरेचा फायदा घेऊन ग्रामीण व शहरी भागातील कांही महिलांची प्रगती होत असल्याचे दिसत असले तरी अद्यापही कितीतरी महिलांना त्याची जाणीव नसल्यामुळे ते त्याचा पुरेशा प्रमाणात लाभ घेत नाहीत.

२. पुरुषी वर्चस्व :-

शेकडो वर्षापासून स्त्रीही अबला आहे. तिचे चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र आहे. तिने तेच कार्यकरावे. व पुरुषांने घराबाहेरील सर्व प्रकारची कामे करावीत. कुटुंबातील सर्व प्रकारच्या गरजांची पूर्तता एकटया पुरुषानेच पूर्ण करावेत त्यात त्याचा पुरुषार्थ आहे असेच आतापर्यंत मानले जात असल्यामुळे जरी स्त्रिची शिक्षण घेण्याची, रोजगार करण्याची किंवा राजकीय क्षेत्रात सहभागी होण्याची इच्छा असली तरी तिला कुटूंबातील किंवा समाजातील पुरुषांकडून विरोध होतो. त्यातूनही जरी एखादी महिला नोकरी करीत असली तरी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेत एखादया पदावर गेली तरी बहुतांशी वेळा तेथील स्त्रीही नामधारीच असते. तिचे सर्व अधिकार पुरुषच वापरत असतो.

३. दारिद्रय :-

ग्रामीण भगातील प्रहुसंख्य कुटूंबे ही दरिद्री आहेत. तसेच बहुसंख्य महिला या पारंपारिक मानसिकतेच्या असल्यामुळे त्यांना आपल्यावरील पुरुषांचे वर्चस्व गैर वाटत नाही.

४. निरक्षरता :-

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष साक्षरतेचा अभ्यास केला असता असे आढळून येते की, प्रत्येक कालखंडात पुरुषांच्यापेक्षा स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. ग्रामीण भागामध्ये तर स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते. त्यामुळे त्यांना विविध क्षेत्रात चांगल्या दर्जाची नोकरी मिळत नाही. तसेच राजकरणातही त्यांचा सहभाग कमी असतो. जरी त्यांना राजकारणात भाग घेण्याची संधी मिळाली तरी त्यांना आपले अधिकार, कर्तव्ये व कायदेकानून कळत नाहीत. त्यामुळे त्या पूर्ण कार्यक्षमतेने काम करू शकत नाहीत.

महिला सक्षमकिरणातील वरील अडथळयाशिवाय पुरुषांचा असहकार, परावलंबन हे ही अडथळे असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष :-

महिला सक्षमीकरण या संकल्पनेचा थोडक्यात आढावा घेतला असता आपणास खालील निष्कर्ष काढता येतील.

१.विविध कालखंडानुसार महिलांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण प्रदलत असून स्त्री पुरुषामधील विषमता कमी होत असल्याचे दिसून येते.

२ महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

३.विविध क्षेत्रातील विविध पदावर महिला नोकरी करीत असून दिवसेंदिवस त्यांचे प्रमाण वाढत आहे.

४. राजकारणातही महिलांचा सहभाग वाढल्याचे दिसून येते.

५. अजून महिलांच्यामध्ये अपेक्षित असे सप्रालीकरण झाले नसल्याचे दिसून येते. त्यामागे निरक्षरता, पारंपारिक मानसिकता व दारिद्रय हे प्रामुख्याने आडथळे असल्याचे आढळून आले.

उपाय :-

१. महिलांच्यामध्ये प्रभावीपणे जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

२. महिलांचे उच्चशिक्षणातील प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.३. पुरुषांची मनोवृती बदलण्यासाठी, स्त्री-पुरुष समानतेचे तत्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत.

४ महिलांनी अर्थिकदृष्टया स्वावलबी बनले पाहिजे.

५. महिलांना त्यांच्या घटनात्मक अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी, त्यांच्यात आत्मविश्वास वाढविण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत

संदर्भग्रंथ :-

१. डॉ. देवळाणकर शैलेंद्र : समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पबिलशर्स, २००५

२. डॉ. गोट- गव्हाणे शुभांगी : महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पबिलकेशन्स, औरंगाबाद.

३. प्रा. खंडागळे चंद्रकांत : ग्रामीण समाजशास्त्र, सौ मायादेवी खंडागळे प्रकाशन, सांगली, २००५

४. डॉ. पाटील हेमलता : स्त्रीयांची आर्थिक व सामाजिक स्थिती, गोदा प्रकाशन, औरंगाबाद.

५. लोकराज्य जुलै २००९.